**निशाणी क्र. ४३**
वर पुढे सुरु



This is a group of seven references and one complaint (ULP). Perusal of all these references goes to show that contention in these references are mostly similar. In this group cross – examination of one employee Mahesh Lohar is recorded in Reference (IDA) No.:- 02/2010. Thereafter, cross – examination are recorded in other references. Adv. Mr. Pankaj Moholkar submitted that he is ready to adopt the cross – examination in Reference (IDA) No.:- 02/2010 in other references. However, Adv. Mr. R. P. Jadhav insisted that cross – examination should be individually recorded in each reference because of personal records and information of each employee. I agree with the contention of Mr. Jadhav. However, it was opined by Mr. Moholkar that this is a group matter and evidence and cross – examination is recorded in one reference. Hence, there are chances that other employees may improvise their cross – examination as per the cross – examination of Mahesh Lohar. Heard both parties. Undoubtedly, this is a group matter. Cross – examination of Mahesh Lohar is available on public record. I also take a judicial note that while Mahesh Lohar was examined these employees in other references were hearing his cross – examination for certain period. This Court asked the group of employees to step away on two occasions. However, these employees were still near the door of Court room for certain period. Hence, the apprehension of Adv. Mr. Moholkar cannot be lost sight of. Hence, cross – examination of this witness is individually recorded. The aforesaid aspects be considered  at the time of appreciating the evidence of this witness.

**<u>द्वितीय पक्षकाराकरीता द्वितीय पक्षकार साक्षीदार क्र. १ चा शपथेवर</u>**

**<u>अधिकचा सरतपास विधीज्ञ श्री. आर. पी. जाधव यांचेमार्फत</u>**

२८. मी दाखल केलेल्या शपथपत्रातील सर्व माहिती व मजकुर मी सांगितल्याप्रमाणे असून तो खरा व बरोबर आहे. सदरचा मजकुर मी वाचून त्यावर सही केली आहे.

दस्तऐवज यादी निशाणी क्रमांक ४५ वरील दस्तऐवज यादी सोबत दाखल दस्तऐवजांना **<u>निशाणी क्रमांक ४५ (१) ते ४५(१०४)</u>** देण्यात येते आहे. तसेच दस्तऐवज यादी निशाणी क्रमांक ३१ वरील दस्तऐवज यादीसोबत दाखल दस्तऐवजांना **<u>३१(१) ते ३१(२)</u>** देण्यात येत आहे.

**<u>प्रथम पक्षकार क्र. १ तर्फे द्वितीय पक्षकार साक्षीदाराचा शपथेवरील</u>**

**<u>उलटतपास विधीज्ञ श्री. मोहोळकर यांचेमार्फत सुरू.</u>**

| | |
|---|---|
| प्र. १ | महेश लोहार तुमच्या कसे ओळखीचे आहेत ? |
| उ | महेश लोहार माझ्या ओळखीचे नाहीत. ते माझ्यासोबत काम करीत होते. |
| प्र. २ | महेश लोहार यांचा साक्षीपुरावा तुम्ही वाचला आहे ? |
| उ | होय. |
| प्र. ३ | महेश लोहार यांची उलटतपासणी तुम्ही वाचली आहे काय ? |
| उ | होय. |
| प्र. ४ | ई.एस. आय. लागू नव्हता या व्यतिरिक्त तुमच्या उलटतपसाणीत तुम्हाला काही वेगळे सांगावयाचे आहे काय ? |
| उ | नाही. |
| प्र. ५ | डी–लावल कंपनीमध्ये कशाचे उत्पन्न चालत होते ? |
| उ | Milking मशिन बनत होते. |
| प्र. ६ | स्टेटमेंट ऑफ क्लेम तुम्ही वाचले आहे काय ? |
| उ | होय. |
| प्र. ७ | तुमचा हुद्दा काय होता ? |
| उ | मला हुद्दा माहीत नाही. कंपनीत जे लोक काम करत होते तेच काम मी करत होतो. |
| प्र. ८ | तुम्ही प्रथम पक्षकार क्र. २ कडे काय काम करत होता ? |

| | |
|---|---|
| उ | मिल्कीग मशिनवर काम करत होतो. |
| प्र. ९ | डी–लावल कंपनीने तुम्हाला नेमणूक पत्र दिले होते काय ? |
| उ | लेखी पत्र दिलेले नाही. |
| प्र. १० | डी–लावल कंपनीमध्ये तुम्ही काम करत होते हे दाखविण्याकरीता कागदोपत्री पुरावा आहे काय ? |
| उ | नाही. |
| प्र. ११ | तुम्हाला पगार कसा मिळत होता ? |
| उ | रोख स्वरूपात मिळत होता. |
| प्र. १२ | पी. एफ. ची कपात पगारातून होत होती काय ? |
| उ | होय. |
| प्र. १३ | पी. एफ. कोड तुम्हाला सांगता येईल काय ? |
| उ | नाही. |
| प्र. १४ | प्रोफेशन टॅक्स तुमच्या पगारातून कपात होत होता काय ? |
| उ | माहीत नाही. |
| प्र. १५ | पी. एफ. ची रक्कम डी–लावल कंपनी कपात करत होती की कॉन्ट्रॅक्टर हे तुम्हाला सांगता येणार नाही ? |
| उ | डी–लावल कंपनी कपात करत होती. |
| प्र. १६ | तुम्हाला पगार स्लीप मिळत होती काय ? |
| उ | नाही. |
| प्र. १७ | तुम्हाला माहीत आहे काय की कंपनीत कार्यरत सर्व कर्मचारी यांचा पगार, बोनस बँकेत जमा होत होता व पी. एफ. कंपनी कपात करीत होती ? |
| उ | मला माहीत नाही. |
| प्र. १८ | तासवडे येथील कंपनीची उत्पादन प्रक्रिया सन २००९ मध्ये बंद पडली आहे? |
| उ | बरोबर आहे. |
| प्र. १९ | सन २००९ मध्ये कंपनीने कॉन्ट्रॅक्टर सोबतचा करार रद्द केला आहे ? |
| उ | मला माहीत नाही. |
| प्र. २० | Tetra Laval कंपनीचे मुख्य कार्यालय कोठे आहे ? |
| उ | पुण्यात आहे. |

| | |
|---|---|
| प्र. २१ | Tetra Laval Company, Tetra Pack Company and Sidel कंपनीचा परिसर, Balance Sheet, Profit & Loss Account, Muster Roll तुम्ही पाहिलेले आहे काय ? |
| उ | नाही. |
| प्र. २२ | D– Laval, Tetra Laval Company, Tetra Pack Company and Sidel कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर, अध्यक्ष व कार्यपध्द्तीबाबत तुम्हाला माहीत आहे काय ? |
| उ | नाही. |
| प्र. २३ | तुमच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ४, ७, ९ व ११ मधील मजकुर शाबीत करण्याकरीता तुमच्या शब्दाशिवाय कागदोपत्री पुरावा आहे काय ? |
| उ | कागदोपत्री पुरावा नाही. |
| प्र. २४ | तुमच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ४, ७, ९ व ११ मधील मजकुर खोटा आहे ? |
| उ | हे म्हणणे खरे नाही. |
| प्र. २५ | २४० दिवस तुम्ही प्रथम पक्ष १ व २ यांच्याकडे काम करीत होते हे दाखविण्याकरीता तुमच्या शब्दाशिवाय काय कागदोपत्री पुरावा आहे ? |
| उ | जॉब कार्डस व्यतिरिक्त इतर पुरावा नाही. |
| प्र. २६ | तुमच्या शपथपत्रात तुम्हाला कोणी, किती तारखेला व किती वाजता कामावरून कमी केले हे नमूद न करण्याचे कारण सांगता येईल काय ? |
| उ | नाही. मला दि. ०५/११/२००८ रोजी कामावरून कमी केले आहे. |
| प्र. २७ | तुम्हाला प्रथम पक्ष क्र. १ कंपनीने कामावरून कमी केले हे तुम्ही खोटे सांगत आहात ? |
| उ | हे म्हणणे खरे नाही. |
| प्र. २८ | तुम्हाला बोनस मिळत होता का ? तो कसा मिळत होता ? |
| उ | बोनस रोखीने मिळत होता. |
| प्र. २९ | कंपनीच्या ऑर्डर शीटबाबत तुम्हाला माहिती आहे काय ? |
| उ | नाही. |
| प्र. ३० | कंपनीच्या उत्पादनाला भरपूर मागणी होती असे दाखविण्याकरीता तुमच्या शब्दाशिवाय कागदोपत्री पुरावा आहे काय ? |
| उ | नाही. |

| | |
|---|---|
| प्र. ३१ | शासनाला पूर्वसूचना व शासनाची पूर्वपरवागनी व त्याबाबतची प्रत कोणत्या कायद्याखाली असते याची तुम्हाला माहिती आहे काय ? |
| उ | नाही. |
| प्र. ३२ | तुमच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. १५ ते २२ मधील मजकुर शाबीत करण्याकरीता कागदोपत्री पुरावा आहे काय ? |
| उ | नाही. |
| प्र. ३३ | तुम्हाला कंपनीने तोंडी हुकुमाने काढून टाकल्याबाबत तुम्ही स्वत: कंपनीला पत्र लिहिले आहे काय ? |
| उ | नाही. |
| प्र. ३४ | तुम्हाला प्रथम पक्ष क्र. १ कंपनीने कधीही तोंडी हुकुमाने कामावरून कमी केलेले नाही ? |
| उ | हे म्हणणे खरे नाही. |
| प्र. ३५ | तुम्ही सही केलेले दिनांक १८ जुलै २००९ रोजीचे पत्र आता दाखविले. त्यात असे नमूद केले आहे की, तुम्हाला डिसेंबर २००८ व जानेवारी २००९ मध्ये तडकाफडकी कामावरून कमी केले ? |
| उ | होय. |
| प्र. ३६ | सन २००८ नंतर आत्तापर्यंत तुम्ही काय काम करता ? |
| उ | मी माझ्या गावी शेती करतो. |
| प्र. ३७ | तुमच्याकडे किती शेती आहे व तुम्ही त्यात काय पिकविता ? |
| उ | माझ्याकडे पुसेसावळी येथे एक एकर शेती असून मी त्यामध्ये ज्वारी व बाजरी पिकवितो. |
| प्र. ३८ | डी–लावल कंपनीचे कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्ट चे रजिस्ट्रेशन व पक्षकार क्र. २ कॉन्ट्रक्टर यांचे लायसन्स तुम्ही स्वत: बघितले आहे काय ? |
| उ | नाही. |
| प्र. ३९ | सन २००९ पासून तुम्ही सर्व ७ कामगार सोबत केस लढत आहात ? |
| उ | होय. |
| प्र. ४० | तुमच्या सर्व सात कामगारांचे प्रकरण सारखे आहे ? |
| उ | होय. |
| प्र. ४१ | तुमच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खोटा व बनावटी आहे ? |
| उ | हे म्हणणे खरे नाही. |

| | |
|---|---|
| प्र. ४२ | तुम्ही खोटी साक्ष देत आहात ? |
| उ | हे म्हणणे खरे नाही. |

**उलटतपास – संपला.**

**फेरतपास – काही नाही.**

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत
वा.दा.व.अ.क.के

ठिकाण – सातारा.
दिनांक – ०५/१२/२०२५

( निखिल अ. गुप्ता )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सातारा.